# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** अहमदनगर कॅम्प
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0604 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/07/2024 16:18

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 22/03/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/03/2024
**Time From (वेळेपासून):** 12:02 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/07/2024 **Time (वेळ):** 16:01 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 024
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/07/2024 16:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** एलसीबी कार्यालय अहमदनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): दिपक भास्कर शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सावळीविहीर ता राहता जि अहमदन,अहमदनगर कॅम्प,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | सावळीविहीर ता राहता जि अहमदन,अहमदनगर कॅम्प,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8421499371

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संदिप चव्हाण पोलीस पुर्ण नाव माहित नाही | | | 1. एलसीबी कार्यालय अहमदनगर, अहमदनगर कॅम्प,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

आणला का तु असे बोलु लागले. मी त्यांना लगेच करतो तुम्ही मला फक्त तेवढ कमी करा एवढं होणार नाही असे बोलुन पैसे कमी करण्याची वेळोवेळी विनंती केली असता, त्यावेळी चव्हाण पोलीस यांनी मागीतलेल्या पैशातुन पाच पन्नास कमी करना, तु डायरेक्ट साठ घ्या म्हणतो.. मी तुझ्यासाठी बोलण खावु का ?..ते आरोपी करतील. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, कमीत कमी किती त्यावेळी त्यांनी दिड असे सांगितले तेव्हा मी त्यांना दिड लाख म्हणालो असता त्यांनी हो म्हणुन सांगितले. त्यावेळी मी त्यांना म्हणालो 'आमची परिस्थिती नाही मार्च एंड चालु आहे संध्याकाळ पर्यंत वेळ दया. त्यावेळी त्यांनी मला तु कुट काही बोलला का असे विचारले मी त्यांना नाही सांगितले असता, ते म्हणाले की, बघ रे याला काही लावलं बिवल काय काही भरवसा नाही याचा त्यावेळी त्यांना माझा संशय आल्याने मी तेथुन निघुन सापळा पथक थांबल्या ठिकाणी आलो होतो. त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी श्रीमती जाधव मॅडम, पंचासमक्ष व सापळा पथकातील सदस्य यांनी संदिप चव्हाण पोलीस व माझेत रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले त्यात चव्हाण पोलीस यांनी माझेकडे माझा भाउ राहुल यास फायरिंगच्या गुन्हयात आरोपी न करता व सोडुन देण्यासाठी 2,00,000/- रुपये मागणी करुन तडजोडीअंती 1,50,000/- रुपयांची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने तात्काळ पुढिल सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते. त्यानंतर श्रीमती गायत्री जाधव मॅडम यांनी मला लाच म्हणुन देण्यासाठीची रक्कम हजर करण्यास सांगितल्यावरुन मी माझे बचतीतील 10,000/- रुपये त्यांच्यासमक्ष हजर केले व त्यात उर्वरीत 1,40,000/- रुपयांच्या डमी नोटा टाकल्या. श्रीमती गायत्री जाधव यांनी लाचेच्या रकमेस अन्थ्रासीन पावडर कषी लावली जाते व त्यांच्या गुणधर्माची माहीती देउन, मपोहवा/ ज्योती शार्दुल यांनी त्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले सदर लाचेच्या रकमेस अन्थ्रासीन पावडर लावून, माझे खिशामध्ये ठेवुन दिल्या. मला व पंच रुपवते यांना आवश्यक त्या सुचना देउन, माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन संदिप चव्हण पोलीस यांना भेटण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे मी व पंच श्री रुपवते असे संदिप चव्हाण पोलीस यांची भेट घेण्यासाठी एलसीबी कार्यालय अहमदनगर येथे गेलो असता कार्यालयाच्या गेटवर माझा भाउ राहुल एकटाच दिसला मला वाटले त्याला पैसे घेण्यासाठी पाठविले असेल म्हणुन मी संदिप चव्हाण पोलीस यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम घेवुन त्यांना भेटण्यासाठी कार्यालयात गेलो असता मी त्यांना बाहेर जातांना पाहिले होते व त्यावेळी संदिप चव्हाण पोलीस हे मोठया साहेबांसोबत गाडीवर बसुन, निघुन गेले असल्याचे समजले व मी भाउ राहुल यास विचारले असता, त्याने त्याला सोडुन दिले असल्याचे सांगितले होते संदिप चव्हाण पोलीस व माझी भेट न झाल्याने, सदर कारवाई स्थगित करण्यात आली व त्याबाबत सविस्तर सदर सापळा कारवाई स्थगीती पंचनामा करण्यात आला आहे. त्यांनतर मला पोलीस निरीक्षक श्रीमती जाधव यांनी पुढील कार्यवाही बाबत विचारणा केली असता, मी त्यांना सांगीतले की, लोकसेवक संदिप चव्हाण पोलीस यांना माझे बाबतीत काही तरी संशय आल्याने त्यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नव्हती व माझा भाउ राहुल याचेविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल न करता त्यास सोडुन दिले होते त्यामुळे माझे त्यांचेकडे कोणत्याही प्रकारचे काम प्रलंबित राहिलेले नाही. त्यानतर पासुन आज पावेतो संदिप चव्हाण पोलीस यांनी माझेशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संपर्क साधला नाही अगर कोणत्याही प्रकारे मागणी केलेली लाच रक्कम स्विकरण्यासाठी प्रयत्न केलेला नाही. संदिप चव्हाण पोलीस यांनी माझेकडे मागणी केलेले 1,50,000/- रूपये ते आता स्विकारणार नाहीत व पुन्हा भविश्यात देखील पैशांची मागणी करणार नाहीत, अशी माझी पुर्णपणे खात्री झाल्याने, त्यांचेविरूध्द कायदेशीर कार्यवाही करा बाबत मी सांगितल्याने तसा माझा दि. 30/06/2024 रोजी सविस्तर जबाब नोंदिवण्यात आला होता. तरी लोकसेवक संदिप चव्हाण पोलीस (पुर्ण नाव माहित नाही), नेमणुक एलसीबी कार्यालय अहमदनगर यांनी दि.22/03/2024 रोजी 12/02 ते 13/ 20 वाजेच्या दरम्यान एलसीबी कार्यालय अहमदनगर येथे आमचे शिर्डी येथील हॉटेल साईदिप शेर ए पंजाबच्या पाठीमागील भागात असलेल्या पार्किंगमध्ये झालेल्या फायरिंगच्या गुन्हयात माझा भाउ राहुल भास्कर शिंदे यास आरोपी न करण्यासाठी व त्याने ताब्यात घेतलेल्या माझे भावाला एलसीबी कार्यालय येथुन सोडुन देण्यासाठी माझेकडे 1,50,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे. समक्ष ही फिर्याद दिली

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** **(प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 24/07/2024

माझे नाव मी दिपक भास्कर शिंदे वय 33 वर्षे धंदा - हॉटेल ,रा. सावळीविहीर ता. राहता जि. अहमदनगर मो.नं. 8421499371 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटूंबियासह राहत असुन,मी व माझा मोठा भाउ राहुल, असे दोघे हॉटेल सन ॲन्ड सन रोड षिर्डी येथे हॉटेल साईदिप षेर ए पंजाब हे चालवुन उदरनिर्वाह करतो. दि.21/03/2024 रोजी सकाळच्या वेळी माझा भाउ राहुल हा हॉटेलवर होता 10/ 30 वा चे सुमारास आमचे हॉटेलचे पाठीमागील भागात असलेल्या पार्किगमध्ये शिर्डी गावातील संपत वायकर व साईनाथ पवार यांच्यात हत्यारे घेवुन भांडणे झाले होते त्यात फायरिंग देखील झाली होती. त्यानंतर काही वेळाने पोलीस तेथे आले व चौकशी करुन निघुन गेले होते. त्यानंतर रात्री 09/30 वाजता मी व भाउ राहुल असे हॉटेलवर असतांना हॉटेलवर पोलीस गाडी आली त्यातील साध्या कपडयात आलेल्या पोलीसांनी आम्हाला राहुल शिंदे कोण आहे असे विचारले भाउ राहुल याने मीच असल्याचे सांगितल्यावर त्याला त्यांनी गाडीत बसवुन घेवुन गेले होते. रात्री 11/30. वाजाता माझे मोबाईल वर मो.नं. 7972963017 यावरुन फोन आला व समोरुन मी संदिप चव्हाण पोलीस बोलत असल्याचे मला सांगितले सकाळी तुमच्या हॉटेलच्या पाठीमागे भांडणात फायरिंगच्या मॅटरमध्ये तुझे भावाला नगर एलसीबी ऑफिसला घेवुन चाललो आहे. त्यात त्याला आरोपी करायचे नसेल तर 2,00,000/- रुपये घेवुन ये आणि तुझे भावाला घेवुन जा. असे सांगितले त्यानंतर पुन्हा 12.00 वाजता देखील फोन करुन पैसे घेवुन बोलवत होते. दि.22/03/2024 रोजी पुन्हा सकाळी माझे वर नमुद मोबाईल फोन वर संदिप चव्हाण पोलीस यांनी फोन करुन पुन्हा सांगितले तुझे भावाला फायरिंगच्या गुन्हयात आरोपी करायचे नसेल तर तुला सांगितले तेवढे पैसे घेवुन ये आणि तुझे भावाला घेवुन जा. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही म्हणुन मी ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक कार्यालयात संपर्क करून माझे तक्रारीबाबत सविस्तर माहिती दिलेली होती, त्याअनुशंगाने श्रीमती गायत्री जाधव पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय नाशिक यांनी माझेकडून माहिती घेवून मी त्यांना सांगितले की, ' मी भावाला परत आणण्यासाठी दि. 22/03/2024 रोजी नगर एलसीबी ऑफिसला जाणार आहे त्यावेळी चव्हाण पोलीस हे माझेकडे लाचेची मागणी करतील अशी मला खात्री आहे त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द कारवाई होणेकामी विनंती केली व जाधव मॅडम यांना अहमदनगर शहरात आल्यानंतर भेट घेण्यास सांगितले.' दि. 22/03/2024 रोजी 11/10 वा चे सुमारास अहमदनगर शहरातील सावेडी नाका, डॉन बॅास्को रोडवर फोनद्वारे झालेल्या संपर्काप्रमाणे श्रीमती गायत्री जाधव पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो नाशिक यांच्याशी भेट झाल्यानंतर त्यांनी त्यांचा परिचय करुन देवुन त्यांच्या सोबत पंच नं. 1) श्री.आकाश तुकाराम रुपवते, वय 31 वर्षे, वनरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी सिन्नर (प्रादेषिक) यांचे कार्यालय सिन्नर ता. सिन्नर जि.नाशिक पंच नं. 2) श्री. गोरख काशिराम पाटील , वय 55 वर्षे, वनरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी सिन्नर (प्रादेषिक) यांचे कार्यालय सिन्नर ता. सिन्नर जि.नाशिक व सापळा पथकाचा परिचय करुन दिला त्यानंतर मी दोन्ही पंचासमक्ष माझी तक्रार माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. सदर तक्रारीचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक श्रीमती गायत्री जाधव मॅडम यांनी दिनांक 22/03/2024 रोजी माझेकडे लोकसेवक संदिप चव्हाण पोलीस हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करणेकामी मला पंच क्र. 01 श्री आकाष रुपवते यांच्यासोबत लोकसेवक संदिप चव्हाण पोलीस यांच्या भेटीसाठी एलसीबी ऑफिस येथे पाठविणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले होते. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री. आकाष रुपवते अषांना पडताळणी कारवाईकामी आवष्यक सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून देवुन माझे कडील इरटिगा कार क्रमांक एमएच 17 सीएक्स 5396 ने एलसीबी कार्यालय अहमदनगर येथे रवाना केले. मी व पंच नं. 01 श्री रुपवते माझे कडील इरटिगा कारने अहमदनगर शहरातून चव्हाण पोलीस भेटणार असलेल्या अहमदनगर एलसीबी ऑफिस येथे गेलो. तेथे गेल्यानंतर मी संदिप चव्हाण पोलीस यांना फोन लावला व सांगितले दादा आम्ही आलो आहे. थोडया वेळातच चव्हाण पोलीस तेथे आले व मला म्हणाले की, सांगितलेल केला का, तु नसन केल तर जा ते सांगितलेल

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

yogesh jagannath rajguru(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

ठाणे अमलदार

**Name** (नाव): yogesh jagannath ra
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):